शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
रयत शिक्षण संस्थेचे
चंद्राबाई- शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी
समाजशास्त्र विभाग
॥ बेटी बचाओ अभियान ॥
वार्षिक अहवाल-२०२३-२४

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर सलंग्नित चंद्राबाई- शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग मार्फत **"बेटी बचाओ अभियान"** अंतर्गत महाविद्यालयात सन २०१७-१८ पासून विविध उपक्रम राबवले जातात.

आज आपण २१ व्या शतकात आणि आधुनिक युगात वावरत असलो तरी देखील महिलांच्याकडे पर्यायाने मुलींच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन समाजाचा बदलेला नाही. आज देखील स्त्रीभ्रूणहत्या, अवैध गर्भपात, मुलींचा छळ, महिलांना मारहाण अशा घटना कमी होताना दिसत नाहीत, मुलींच्या जन्माचे स्वागत होत नाही म्हणून समाजातील लोकांची मानसिकता बदलण्यासाठी महाविद्यालयातर्फे चालू वर्षी पुढीलप्रमाणे उपक्रम राबवले गेले.

दि.२९/१०/२०२३ रोजी शिवाजी विद्यापीठात "बेटी बचाओ अभियान" अंतर्गत कार्यशाळेस विभागाचे डॉ. विजय घेजी उपस्थित राहिले.

दि. ०८/०१/२०२३ रोजी रोजी महाविद्यालयात 'स्त्रीभ्रूणहत्त्या' विषयावर व्हिडीओ दाखवण्यात आला.

दि. ०९/०३/२०२३ रोजी महाविद्यालयातील मुलींसाठी 'विद्यार्थी आरोग्य शिबीर' घेण्यात आले.

दि. २९/०४/२०२३ रोजी "मुली आणि समकालीन समाज" या विषयावर डॉ. अक्षता गावडे, नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स कोल्हापूर यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले या व्याख्यानाला विद्यार्थ्यांनी भरघोस असा प्रतिसाद दिला.

तसेच महाविद्यालयाच्या 'कर्मरजत' या अंकामध्ये समाजात जनजागृती करण्यासाठी वेगवेगळया विषयावर लेख प्रकाशित केले जातात.

तसेच या वर्षी महाविद्यालयातर्फे कॉलेजच्या स्टाफ कडून एकूण रु. ३०००/- इतकी रक्कम गोळा करण्यात आली आणि ज्या परिवारामध्ये एक किंवा दोन मुलींच्यावर ऑपरेशन केले असेल व सर्वसामान्य परिवार असेल अशा कुटुंबाचा शोध घेऊन लहान मुलीच्या नावे ती रक्कम मुदत ठेव म्हणून ठेवण्यात आली ही रक्कम त्या मुलगीला १८ वर्ष पूर्ण झाल्यावर पुढील उच्च शिक्षणासाठी वापरता येईल असा त्या मागचा हेतू आहे. या वर्षी कु. पल्लवी रामचंद्र शेवाळे रा. तळदगे फाटा हिची निवड करण्यात आली.

या अभियानासाठी प्र. प्राचार्य प्रो. डॉ. डी. आर. भोसले सर व सर्व सहकारी प्राध्यापक आणि प्राध्यापिका व विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य आणि मार्गदर्शन मिळाले. या अभियानाचे चेअरमन म्हणून डॉ. संदीप सुर्यवंशी यांनी मोलाचे योगदान दिले.

चेअरमन
बेटी बचाओ अभियान

प्राचार्य
चंद्राबाई-शांताप्पा शेंडुरे कॉलेज,
हुपरी.

Scanned with OKEN Scanner

रयत शिक्षण संस्थेचे

**चंद्राबाई- शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी**

समाजशास्त्र विभाग

**II बेटी बचाओ अभियान II**

2023-24 या वर्षी महाविद्यालयातर्फे कॉलेजच्या स्टाफ कडून एकूण रु. ३०००/- इतकी रक्कम गोळा करण्यात आली आणि ज्या परिवारामध्ये एक किंवा दोन मुलींच्यावर ऑपरेशन केले असेल व सर्वसामान्य परिवार असेल अशा कुटुंबाचा शोध घेऊन लहान मुलीच्या नावे ती रक्कम मुदत ठेव म्हणून ठेवण्यात आली ही रक्कम त्या मुलगीला १८ वर्ष पूर्ण झाल्यावर पुढील उच्च शिक्षणासाठी वापरता येईल असा त्या मागचा हेतू आहे. या वर्षी कु. पल्लवी रामचंद्र शेवाळे रा. तळदगे फाटा हिची निवड करण्यात आली.



Chandrabai-Shantappa Shendure College, Hupari

Scanned with OKEN Scanner